ग्रंथमालिका ‘स्वभावदोष आणि अहं यांचे निर्मूलन’ : खंड ८

सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचा साधनेविषयीचा नाविन्यपूर्ण दृष्टीकोन !

# अहं-निर्मूलनासाठी साधना

मराठी (Marathi)

**संकलक**

हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ**

**सनातन संस्था**


卐 सनातनच्या ग्रंथांची भारतातील भाषांनुसार संख्या 卐

मराठी ३४४, इंग्रजी २०१, कन्नड १९८, हिंदी १९५, गुजराती ६८, तेलुगु ४५, तमिळ ४३, बंगाली २९, मल्ल्याळम् २४, ओडिया २२, पंजाबी १३, नेपाळी ३ अन् आसामी २

**फेब्रुवारी २०२४ पर्यंत ३६५ ग्रंथांच्या १३ भाषांत ९५ लाख ९६ सहस्र प्रती प्रसिद्ध !**

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या आध्यात्मिक संशोधनकार्याचा संक्षिप्त परिचय



१. ‘ईश्वरप्राप्तीसाठी कला’ याविषयी मार्गदर्शन आणि संगीत, नृत्य इत्यादी कलांचे सात्त्विक सादरीकरण करण्याविषयी संशोधन

२. आचारपालनातील कृती, धार्मिक कृती आणि बुद्धीअगम्य घटना यांचे वैज्ञानिक उपकरणांद्वारे संशोधन

३. शारीरिक आणि मानसिक, तसेच वाईट शक्तींच्या त्रासांवरील उपायपद्धतींविषयी संशोधन

४. २०.३.२०२४ पर्यंत २ बालक-संतांची, तसेच ६० टक्क्यांहून अधिक आध्यात्मिक पातळी असलेल्या २२७ अन् अन्य ९१८ दैवी बालकांची ओळख समाजाला करून दिली आहे. दैवी बालकांविषयी संशोधनही चालू आहे.

५. स्वतःचा (सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचा) देह, स्वतःच्या वापरातील वस्तू यांच्यातील दैवी पालटांविषयी संशोधन अन् स्वतःच्या महामृत्यूयोगाचा संशोधनात्मक अभ्यास

(संपूर्ण परिचयासाठी वाचा – **www.Sanatan.org**)

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !

स्थूल देह असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वां ठायी ।।
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ।। – जयंत बाळाजी आठवले

१५.५.१९९६

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या एक आध्यात्मिक उत्तराधिकारी श्रीचित्‌शक्ति सौ. अंजली मुकुल गाडगीळ (M.Sc.) यांचा परिचय



१. नाडीभविष्यात महर्षींनी सांगितल्याप्रमाणे फेब्रुवारी २०१९ मध्ये सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या 'एक आध्यात्मिक उत्तराधिकारी' म्हणून घोषित !

२. सनातनच्या ग्रंथांच्या संकलक : प्रतिभा जागृत झाल्याने अध्यात्मातील विविध विषयांवर ज्ञानप्राप्ती. या ज्ञानाचा सनातनच्या ग्रंथांत समावेश !

३. संगीतकलेद्वारे साधना : देवतांचे नामजप अन् आरत्या म्हणतांना त्यांतील नादशास्त्र, भाव जागृत होणे आदींविषयी संशोधन !

४. चैतन्यमय वस्तूंचा संग्रह आणि प्रदर्शन !

५. हिंदु राष्ट्रासाठी संतांचे संघटन, तसेच नाडीभविष्यात महर्षींनी सांगितल्याप्रमाणे भारतभर भ्रमण करून देवदर्शन आणि धार्मिक विधी यांद्वारे देवतांचा आशीर्वाद मिळवणे !

---

**टीप :** ग्रंथातील काही सूत्रांच्या (मुद्यांच्या) शेवटी मराठी किंवा इंग्रजी अक्षरांत संकेतांक वा सांकेतिक चिन्हे कार्यालयीन सोयीसाठी दिली आहेत. त्यांचा लिखाणाशी संबंध नाही. काही अपरिहार्य कारणामुळे काही संकेतांक इंग्रजीत ठेवले आहेत.

### परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या 'सच्चिदानंद परब्रह्म' या उपाधीविषयी विवेचन !

१३.७.२०२२ पासून 'सप्तर्षी जीवनाडीपट्टी'च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना 'सच्चिदानंद परब्रह्म' ही उपाधी लावण्यात येत आहे. त्यापूर्वी त्यांना ग्रंथांमध्ये 'प.पू.' आणि 'परात्पर गुरु' या उपाध्यांनी संबोधले आहे. यानुसार ग्रंथाच्या मुखपृष्ठावर आणि ग्रंथात तसा तसा उल्लेख केला आहे.

# अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)


| | | |
|---|---|---|
| १. | ‘अहं’ या शब्दाची व्याख्या आणि अर्थ | १० |
| २. | ‘अहं’चे समानार्थी शब्द | १० |
| ३. | अहंचे प्रकार (ईश्वराचा अहं, मनुष्याचा अहं इत्यादी) | १० |
| ४. | पातळीनुसार अहंचे प्रकार, साधना आणि जीवन | १३ |
| ५. | अहं आणि इतर | १४ |
| | ५ अ. शिष्य आणि अहं ५ आ. उन्नत आणि अहं | १४ |
| | ५ इ. कुंडलिनी आणि अहं ५ ई. वाईट शक्ती आणि अहं | १६ |
| ६. | अहंची निर्मिती | १७ |
| | ६ अ. अहं निर्माण होण्याचे तात्त्विक विवेचन | १७ |
| | ६ आ. अहं निर्माण होण्याची कारणे | १८ |
| ७. | अहंमुळे होणारी हानी आणि अहं नष्ट होण्याचे महत्त्व | २४ |
| ८. | अहं अल्प करण्याच्या साधनेतील महत्त्वाचे घटक (सेवा, त्याग, प्रीती, नामजप इत्यादी) | ३२ |
| ९. | अहं घालवण्याचे उपाय | ३७ |
| | ९ अ. मानसशास्त्रानुसार अहं घालवण्याचे उपाय | ३७ |
| | ९ आ. कर्मयोगानुसार अहं घालवण्याचे उपाय | ५१ |
| | ९ इ. ज्ञानयोगानुसार अहं घालवण्याचे उपाय | ५२ |
| | ९ ई. भक्तीयोगानुसार अहं घालवण्याचे उपाय | ५५ |
| | ९ उ. शिष्याने अहं घालवण्यासाठी करावयाचे उपाय | ६१ |
| | ९ ऊ. स्वप्रयत्न, गुरुकृपा आणि अहं अल्प होणे | ६३ |

**१०. अहंचा लय होण्यामागील तत्त्व ६४**

**११. अहं अल्प झाल्यावर होणार्‍या आध्यात्मिक उन्नतीची लक्षणे ६४**

११ इ. प्रीती निर्माण होणे ११ उ. अद्वैताची अनुभूती ६५

**१२. अहं-निर्मूलनासाठी साधकांचे प्रयत्न आणि त्यांच्या अनुभूती ६६**

**卐 ‘अहं-निर्मूलनासाठी साधना’ या विषयीचे सखोल ज्ञान ८५**

**卐 प्रस्तुत ग्रंथाचे असामान्यत्व लक्षात घ्या ! ८६**

**卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती ८९**

## सनातनच्या दोन सद्गुरूंच्या नावांच्या आधी विशिष्ट आध्यात्मिक उपाधी लावण्यामागील कारण

जीवनाडीपट्टी-वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्गुरु (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ यांना ‘श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ’ आणि सद्गुरु (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ यांना ‘श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ’ असे संबोधले जात आहे. या संतद्वयी सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी आहेत.

**स्वभावदोष अन् अहं यांचे निर्मूलन करण्यासाठी मार्गदर्शक सनातनचा ग्रंथ !**

## स्वभावदोष आणि अहं यांच्या विविध पैलूंचे विश्लेषण




या ग्रंथात स्वभावदोष आणि त्यांमागे दडलेला अहं यांचे विवेचन केले आहे. स्वभावदोष व अहं यांचे पैलू नेमकेपणाने शोधले, तर त्यांच्या निर्मूलनासाठी मुळापासून प्रयत्न करता येतात. याविषयी मार्गदर्शन करणारा हा ग्रंथ व्यष्टी साधना चांगली होण्यासह आनंदी जीवनासाठीही उपयुक्त आहे.

## मनोगत

मी झालो ऐसे म्हणे । तो काहिच नेणे ॥

ज्ञानेश्वर माउलींच्या या उक्तीवरून मनुष्यातील 'मी'पणाची, म्हणजे अहंची व्यर्थता लक्षात येते. अहं हा मनुष्याच्या ऐहिक, तसेच पारमार्थिक सुखाच्या मार्गातील एक मोठा धोंडा आहे. अहंचे बीज हे मनुष्यजन्मातच असल्याने लहान-थोर, गरीब-श्रीमंत, सुशिक्षित-अशिक्षित इत्यादी सर्वांमध्येच तो अल्प-अधिक प्रमाणात का होईना, पण असतोच.

अहं शेतात उगवणाऱ्या तणासारखा असतो. जोपर्यंत आपण तण समूळ नष्ट करत नाही, तोपर्यंत चांगले पीक हाती लागत नाही. सतत त्या तणाची कापणी करावी लागते. तसेच अहं संपूर्ण नष्ट झाल्याविना परमेश्वरी कृपेचे पीक येणे शक्य नाही. साधनेचा उद्देशच अहंचा लय करणे हा असला, तरी अहं मनुष्यात इतका खोलवर मुरलेला असतो की, साधना करतांनाही तो लवकर संपुष्टात येणे सहज शक्य नसते; म्हणून 'साधनेने अहं आपोआप नष्ट होईलच', असा विचार न करता अहं-निर्मूलनाच्या दृष्टीने जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक ठरते.

या ग्रंथात अहंची व्याख्या, प्रकार, निर्मिती, लय आदी तात्त्विक विवरण देतांनाच अहं निर्माण होण्याची कारणे, अहंमुळे होणारी हानी, अहं नष्ट होण्याचे महत्त्व इत्यादी माहितीही दिली आहे. अहं दूर करण्यासाठीचे साधनेतील विविध घटक आणि विविध साधनामार्गांनुसार आचरणात आणावयाचे सोपे उपायही या ग्रंथात दिले आहेत. काही साधकांनी अहं-निर्मूलनाच्या दृष्टीने केलेले प्रयत्न आणि त्यांना आलेल्या अनुभूती यांचाही अंतर्भाव या ग्रंथात केला आहे.

या ग्रंथात दिलेले अहं-निर्मूलनाचे प्रयत्न अधिकाधिक जणांनी आचरणात आणून लवकर मोक्षप्राप्ती करून घ्यावी, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**

('अध्यात्मशास्त्र' या ग्रंथमालिकेतील सर्व खंडांचे सामायिक मनोगत सनातनच्या 'धर्माचे मूलभूत विवेचन' या ग्रंथात दिले आहे.)